संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
30 OCT 2025
प्राप्त झाले सही.................

**प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करणेबाबत.**
**श्री. नितीन न. उमरे, लेखाधिकारी.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
शासन आदेश:-संलेको-२०२५/प्र.क्र.१४८/कोषा प्रशा -२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ३०.१०.२०२५.

<u>संदर्भ</u>:- १) सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेवको /प्रशा-राप/का-६/ स.प्र.का.श्री. उमरे/०६.२५/५९४/५१०/२५३७, दि.१२.०६.२०२५
२) उपविभागीय कृषी अधिकारी,पांढरकवडा, जि.यवतमाळ यांचे पत्र जा.क्र.उविकृअ/आस्था/ कार्यमुक्त/७०३/२०२४, दि.२९.०६.२०२४,
३) सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती यांचे क्र. ससंलेको/अम/आस्था-२/म.वि.ले.से. एकतर्फी कार्यमुक्त/२२७/२०२४,दि.१३.०९.२०२४,
४) शासन वित्त विभाग आदेश क्र.संलेको-२०२४/प्र.क्र.१३६/कोषा प्रशा-२, दि.१२.०९.२०२४,
५) उपकोषागार कार्यालय, केळापूर, यवतमाळ यांचे पत्र जा.क्र.उपकोष रुजू अहवाल/६६/ २०२४, दि.१७.०९.२०२४,
६) सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती यांचे क्र. ससंलेको/अम/आस्था-२/वैय.नस्ती श्री. उमरे/१०३४/२०२४/१५७२,दि.२२.१०.२०२४,

**<u>शासन आदेश</u>**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा लेखाधिकारी संवर्गातील श्री. नितीन न उमरे हे लेखा अधिकारी, नानाजी देशमुख कृषि संजीवनी, प्रकल्प पांढरकवडा या पदावर कार्यरत होते. जागतिक बँक सहाय्यित नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-१ चा कालावधी दि.३०.०६.२०२४ रोजी संपुष्टात आल्याने संदर्भ क्र.२ दि.२९.०६.२०२४ रोजीच्या आदेशान्वये श्री. उमरे यांना दि.३०.०६.२०२४ (म.नं.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले.

२. वित्त विभाग शासन परिपत्रक दि.२०.०२.२००८ नुसार पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असलेले श्री. उमरे हे दि.०१.०७.२०२४ ते दि.०४.०७.२०२४ या कालावधीत ४ दिवसांची अर्जित रजा उपभोगून सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग, अमरावती येथे दि.०५.०७.२०२४ (म.पू) रोजी रुजू झाले.

३. श्री. उमरे यांना संदर्भ क्र.४, दि.१२.०९.२०२४ रोजीच्या शासन आदेशान्वये लेखा अधिकारी, उपकोषागार कार्यालय, केळापूर, यवतमाळ या पदावर पदस्थापना देण्यात आली. त्यानुषंगाने श्री.उमरे यांना सदर पदस्थापनेच्या पदावर हजर होण्याकरीता संदर्भ क्र.३ अन्वये दि.१३.०९.२०२४ (म.नं.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले.

४. श्री. उमरे हे दि.१४.०९.२०२४ (शनिवार), दि.१५.०९.२०४ (रविवार) आणि दि.१६.०९.२०२४ (सार्वजनिक सुट्टी) उपभोगून उपकोषागार कार्यालय, केळापूर, यवतमाळ या कार्यालयात उपकोषागार अधिकारी या पदस्थापनेच्या पदावर दि.१७.०९.२०२४ (म.पू) रोजी हजर झाले आहे.



01335/2025/1909
31.10.2025

५. श्री. उमरे यांची दि.०१.०७.२०२४ ते दि.०४.०७.२०२४ या कालावधीतील अर्जित रजा सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती यांच्या संदर्भ क्र.६ दि.२२.१०.२०२४ रोजीचे आदेशान्वये मंजूर करण्यात आलेली आहे.

६. सबब, म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण सेवाशर्ती) नियम, १९८१ च्या नियम ९ (१४) (फ) मधील तरतूदींनुसार श्री. नितीन र. उमरे, लेखा अधिकारी यांचा खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे प्रतिक्षाधीन कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे :

| अ.क्र | कालावधी | दिवस | शेरा |
|---|---|---|---|
| १. | दि.०५.०७.२०२४ ते दि.१३.०९.२०२४ | ७१ दिवस | पदस्थापनेच्या पदवार सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती येथे हजर. |
| २. | दि.१४.०९.२०२४ ते दि.१६.०९.२०२४ | ०३ दिवस | साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टी. |
| | **एकुण कालावधी** | **७४ दिवस** | |

८. उपरोक्त परिच्छेद ६ मधील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे प्रतिक्षाधीन कालावधीचे वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(ता.र.पवार)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत :-

१) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर*,
२) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३) सहसंचालक,लेखा व कोषागारे, अमरावती विभाग, अमरावती,*
४) संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख,*
५) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहाय्यक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
६) श्री. नितीन न. उमरे, लेखाधिकारी *
७) निवड नस्ती, कोषा प्रशा -२,

*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)